**प्रकल्प प्रवर्तक मे. जे. एस. डब्ल्यू. धरमतर पोर्ट प्रायव्हेट लिमिटेड, डोळवी, तालुका-पेण, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित (फेज-III) विस्तारीकरण म्हणजे मालवाहतुक ३३.९५ दशलक्ष टन प्रतिवर्ष वरुन ५४.०० दशलक्ष टन प्रतिवर्ष (२१.९५ दशलक्ष टन प्रतिवर्ष वाढ) पर्यंत विस्तारीकरण संदर्भात पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी बाबतचे इतिवृत्त –**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. जे. एस. डब्ल्यू. धरमतर पोर्ट प्रायव्हेट लिमिटेड, डोलवी, तालुका-पेण, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित (फेज-III) विस्तारीकरण म्हणजे मालवाहतुक ३३.९५ दशलक्ष टन प्रतिवर्ष वरुन ५४.०० दशलक्ष टन प्रतिवर्ष (२१.९५ दशलक्ष टन प्रतिवर्ष वाढ) पर्यंत विस्तारीकरण संदर्भात पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी शुक्रवार, दिनांक २२ ऑगस्ट, २०२५ रोजी दुपारी ०३.३० वाजता मे. जे. एस. डब्ल्यू. जेट्टी वाहनतळ, धरमतर पोलिस तपासणी नाका, वावे (वडखळ), तालुका-पेण, जिल्हा-रायगड – ४०२ १०७, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यात आलेली होती.

सौ. ऋतुजा भालेराव, उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई – ४०० ६१४ तथा आयोजिका, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी श्री संदेश शिर्के, अपर जिल्हादंडाधिकारी, रायगड,अलिबाग तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती; श्री संजय भोसले, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती; स्थानिक लोकप्रतिनिधी, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, विविध चॅनलचे प्रतिनिधी, पोलिस प्रशासन व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे, मा. जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड, अलिबाग आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड कार्यालय

यांच्यातर्फे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजिका, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की, भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व तदनंतर वेळोवेळी अधिसूचित केलेल्या सुधारणाअन्वये, विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक पूर्व अनुमती (prior Environmental Clearance) घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजित करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजिका यांनी स्पष्ट केले की, पर्यावरणीय समस्यांवरील सार्वजनिक सुनावणीचे प्राथमिक उद्दिष्ट प्रकल्प हे प्रकल्पबाधित क्षेत्रातील रहिवाशांना येणारा प्रकल्प आणि त्याच्या संभाव्य पर्यावरणविषयक परिणामांबद्दल माहिती देणे, योजलेल्या आवश्यक प्रदूषण नियंत्रण उपायांबद्दल माहिती सामायिक करणे आणि त्यांच्या सूचना आणि अभिप्राय गोळा करणे आहे.

आयोजिका, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी माहिती दिली की, प्रकल्प प्रवर्तक मे. जे. एस. डब्ल्यू. धरमतर पोर्ट प्रायव्हेट लिमिटेड, डोळवी, तालुका-पेण, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित (फेज-III) विस्तारीकरण म्हणजे मालवाहतुक ३३.९५ दशलक्ष टन प्रतिवर्ष वरुन ५४.०० दशलक्ष टन प्रतिवर्ष (२१.९५ दशलक्ष टन प्रतिवर्ष वाढ) पर्यंत विस्तारीकरण संदर्भात पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी प्रकल्प प्रवर्तकांचा अर्ज दिनांक १५.०७.२०२५ रोजी मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्राप्त झाला.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित तरतुदींनुसार संवर्ग "अ" ७ (ई) – पोर्ट, हार्बर, ब्रेकवॉटर्स, ड्रेजिंग अंतर्गत मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्राप्त करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक २१.०२.२०२४ रोजी सादर केला व त्या अर्जास भारत सरकारने TOR मंजुरी दिनांक १९.०५.२०२४ रोजी प्रदान केली. सदरील TOR मध्ये राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यात यावी असे सूचित केले आहे.

तसेच, प्रकल्प प्रवर्तकांनी भारत सरकारच्या निर्देशांनुसार नाबेट (NABET) मंजुरी प्राप्त असलेल्या पर्यावरण सल्लागार **बिल्डिंग एनविरोनमेंट (इंडिया) प्रायवेट लिमिटेड** यांची नियुक्ती करून त्यांच्याव्दारे प्रकल्प स्थानाच्या १० किमी त्रिज्येमध्ये तपशीलवार पर्यावरण सर्वेक्षण ०१ ऑक्टोबर, २०२३ ते ३१ डिसेंबर, २०२३ (तीन महिने) या कालावधीत पुर्ण करण्यात आले. प्रस्तावित प्रकल्प स्थापनेमुळे पर्यावरणावर होणा-या संभाव्य परिणामाचा/आघातांचा अभ्यास करण्यासाठी प्रकल्पाच्या जागेचा आणि पर्यावरण प्रभाव मूल्यांकन (EIA) अहवालाचा मसुदा तयार करण्यात आला आणि तो मंडळास जनसुनावणीसाठी सादर करण्यात आला.

सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी पत्र क्रमांक No. / MPCB / JD(WPC) / ENV-PH / B-250716-FTS-0189 दिनांक १६.०७.२०२५ अन्वये उप-प्रादेशिक कार्यालय, रायगड-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई – ४०० ६१४ यांना सदरील प्रकल्पासाठी पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी आयोजित करण्याची प्रक्रिया राबविण्याची सूचना केली.

तदनंतर, उप प्रादेशिक कार्यालय, रायगड-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई – ४०० ६१४ यांनी दिनांक १५.०७.२०२५ रोजीच्या पत्राअन्वये मा. जिल्हाधिकारी, रायगड, अलिबाग यांना सदरहू प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी प्रक्रिया सुरू करण्यास अनुमति देण्याबाबत विनंती केलेली होती.

मा. जिल्हाधिकारी,रायगड,अलिबाग यांनी त्यांच्या पत्र दिनांक १८.०७.२०२५ नुसार प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी शुक्रवार, दिनांक २२ ऑगस्ट, २०२५ रोजी दुपारी ०३.३० वाजता मे. जे. एस. डब्ल्यू. जेट्टी वाहनतळ, धरमतर पोलिस तपासणी नाका, वावे (वडखळ), तालुका-पेण, जिल्हा-रायगड – ४०२ १०७, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यास मान्यता दिल्यानंतर मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश क्रं. ई- ५४ / २०२५, व्दारा पत्र क्रं. बीओ / जेडी (डब्लुपीसी)/पीएच/बी-२५०७२८-एफटीएस-००८०, दिनांक २८.०७.२०२५ अन्वये भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना एस.ओ. क्रं. १५३३, दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना एस. ओ. ३०६७ (इ), दिनांक ०१-१२-२००९ अनुसार खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती गठित केली:-

| | |
|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, रायगड, अलिबाग,<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - **अध्यक्ष** |
| **२)** महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई<br>यांचे प्रतिनिधी –<br>प्रादेशिक अधिकारी - रायगड,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>रायगड भवन, सी.बी.डी.बेलापूर,<br>नवी मुंबई – ४०० ६१४ | - **सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी,रायगड-२,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, | - **आयोजक** |

रायगड भवन, सी.बी.डी.बेलापूर,

नवी मुंबई – ४०० ६१४

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक अधिकारी,रायगड-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई – ४०० ६१४ यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक कृषिवल आणि दैनिक रायगड टाईम्स यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत दिनांक २२ जुलै, २०२५ रोजी प्रस्तावित प्रकल्पाबाबत जनसुनावणी सूचना सर्व जनतेस अवगत करण्यासाठी प्रकाशित केलेली होती. तसेच सदरहू प्रकल्पाबाबतचे सर्व दस्तावेज जनतेच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी खालील अधिसूचित (notified)/ कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते –

१) प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य झोन, न्यु सेक्रेटरीएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन्स, नागपूर – ४४० ००१

२) मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,रायगड,अलिबाग,

३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, रायगड, अलिबाग,

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, रायगड,अलिबाग,

५) उप विभागीय अधिकारी, पेण, तालुका-पेण जिल्हा –रायगड,

६) उप विभागीय अधिकारी,अलिबाग, तालुका-अलिबाग, जिल्हा –रायगड,

७) मा. पोलिस अधिक्षक, तालुका-अलिबाग,जिल्हा-रायगड,

८) तहसीलदार, तहसील कार्यालय,पेण, तालुका-पेण, जिल्हा- रायगड,

९) तहसीलदार, तहसील कार्यालय,अलिबाग, तालुका-अलिबाग, जिल्हा- रायगड,

१०) गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,पेण, तालुका-पेण, जिल्हा-रायगड,

११) गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, अलिबाग, तालुका-अलिबाग, जिल्हा- रायगड,

१२) **तालुका-पेण:-** ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालये- डोळवी, काराव, वडखळ, बोरी, खारपाले, कासू, निगडे, आमटेम, कोलेटी, कासू, शिर्कि, मसद, कांदळे, उंबडे, कोप्रोली, मळेघर, वाशी, वढाव, काळेश्री, बोरजे, कणे, रोडे, पाटणेश्वर, तरणखोप, दिव, तालुका-पेण, जिल्हा-रायगड,

१३) **तालुका-अलिबाग:**-ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालये-शहाबाज, पोयनाड, आंबेपूर, पेझारी, शहापूर, श्रीगाव, कुसुंबळे, कुर्डूस, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड,

१४) मा. सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.

१५) मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, सिनेप्लॅनेट सिनेमासमोर, ३रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन सर्कलजवळ, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२

१६) प्रादेशिक अधिकारी,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, ६वा मजला, सेक्टर-११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई – ४०० ६१४,

१७) उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, ६वा मजला, सेक्टर-११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई – ४०० ६१४,

१८) संकेत स्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई – मराठी व इंग्रजी कार्यकारी सारांश अहवाल उपलब्ध केलेला आहे.

आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नवी मुंबई यांना ८२०९ सूचना/ आक्षेप विविध सूचित कार्यालयाकडून/प्रत्यक्ष/पोस्टाने प्राप्त झालेले आहेत.

आयोजिका यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याची संधी देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात देऊ शकतात असे सांगितले.

आयोजिका यांनी प्रतिपादन केले की, ही पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती फक्त लोकांचे पर्यावरणविषयक मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. स्थानिक जनतेने जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची जनसुनावणीच्या इतिवृतात नोंद घेण्यात येईल व बैठकीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीचे व्हिडिओ रेकॉर्डींग, जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना/आक्षेप, बैठकीचे इतिवृत्त हा सर्व दस्तावेज पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करण्यात येईल. त्यावर केंद्रीय मंत्रालय येथील तज्ज्ञ समिती पर्यावरणीय मंजुरीबाबत पुढील निर्णय घेते.

त्यानंतर आयोजिका यांनी मा. अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी (Environment Management Plan) सादरीकरण केले.

प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की जे.एस.डब्लु धमरतर पोर्ट हे बेनेघाट, तालुका-पेण, जिल्हा-रायगड येथे अंबा नदी/धरमतर खाडीलगत उजव्या काठावर आहे. याची सध्याची मालवाहतुक क्षमता ३३.९५ दशलक्ष टन प्रतिवर्ष असून भविष्यातील स्टील प्रकल्पाचा विस्तार व मालाची गरज पूर्ण करण्यासाठी धरमतर पोर्टची क्षमता ५४.०० दशलक्ष टन प्रतिवर्ष करण्याचे नियोजित केलेले आहे. सदरहू विस्तारीकरणासाठी कोणत्याही अतिरिक्त जलपरिसर किंवा बॅक-अप क्षेत्राची आवश्यकता नाही.

विस्तारीकरणामुळे अंदाजे २५० व्यक्तींना रोजगाराची संधि मिळू शकते. सदरहू विस्तारीकरणामुळे स्थानिक परिसरात अप्रत्यक्ष व्यवसायात प्रचंड प्रमाणात वाढ होईल. प्रकल्पात विविध पर्यावरणीय व्यवस्थापन उपायांसाठी सुमारे ५.१७ कोटींची भांडवल गुंतवणूक करण्यात आलेली असून पर्यावरणीय उपाययोजनांसाठी सुमारे ०.७१ कोटी राखीव ठेवण्यात आलेले आहे. तसेच तेल गळती व्यवस्थापन योजना तयार आहे.

मागील दहा वर्षात प्रकल्प परिसरातील विविध गावांमध्ये विविध सामाजिक उपक्रमांसाठी सुमारे १३,४२.४१ लाख रुपये खर्च करण्यात आलेले आहेत.

पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी (ईएमपी) सविस्तर माहिती दिली. त्यांनी सांगितले की सदरहू प्रकल्प हा स्थानिक परिसर, महाराष्ट्र राज्य व देशाच्या हिताचा आहे.

सादरीकरण पुर्ण झाल्यानंतर अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक सूचना, टीकाटिप्पणी, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले. आपली भूमिका मांडताना प्रथम आपले नांव, गावाचे नांव सांगण्यात यावे अशी विनंती करण्यात आली.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना सांगितले की आपण उपस्थित करण्यात येणा-या मुद्द्यांचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यात येणार आहे, तसेच सदरहू जनसुनावणीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येणार आहे.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

**१) डॉ. केतकी सतिश तरे, सरपंच,ग्रुप ग्रामपंचायत, शहाबाज, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड:-**

प्रकल्प प्रवर्तक फक्त स्टील उत्पादनाच अग्रसेर नाही, तर सामाजीक उपक्रमातही अग्रेसर आहे. उद्योग उभारल्यामुळे स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध होतील. आपल्या गावातील, तालुक्यातील व जिल्ह्यातील तरुणांना रोजगाराच्या नविन संधि मिळतील. ग्रुप ग्रामपंचायत शहाबाज तर्फे मी सरपंच म्हणून जेएसडब्लु फेज-३ (Phase-III) विस्तारीकरणास पाठिंबा देत आहे. औद्योगिक विकासामुळे हा परिसर आर्थिकदृष्ट्या सक्षम होईल. त्यामुळे लघु उदयोगांनाही चालना मिळेल. प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने सर्वप्रकारे काळजी घेण्याचे आश्वासन दिलेले आहे. मी मनापासून या प्रकल्पाचे समर्थन करते.

**२) श्री निलेश पांडुरंग म्हात्रे, सदस्य, ग्रुप ग्रामपंचायत वडखळ, तालुका-पेण, जिल्हा-रायगड:-**

मी सदस्य, ग्रामपंचायत वडखळ या नात्याने आणि माझ्या वडखळ ग्रामस्थांच्या वतीने सूचना, विचार मांडत आहे. आम्ही पर्यावरण हाच नारायण, निसर्ग हाच देव मानणारे लोक आहोत. आम्ही धरमतर बंदराच्या अडीच कि.मी. अंतरावर राहणारे लोक आहोत.

दोन्ही प्रकल्पांचे सादरीकरण पाहिल्यानंतर त्यातील काही त्रुटी आणि काही सूचना देऊ इच्छितो की –

अ) प्रकल्प प्रवर्तकांकडून फक्त महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने पारित केलेले मानकांपेक्षा आंतरराष्ट्रीय पारित मानकांप्रमाणे (Prescribed International Norms) प्रदूषण नियंत्रण करण्यात यावे.

ब) धरमतर बंदर आमच्या ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्येच आहे. तरी येथे जी बांधबंदी (Bunding) केलेली आहे, ती त्वरित रद्द करुन आमच्या ग्रामपंचायत हद्दीतील शेतक-यांना भातशेतीची लागवड करण्यास प्रवृत्त करण्यात यावे.

क) ग्रामपंचायत कार्यालय, वडखळ यांच्याकडून प्रदूषण नियंत्रणाबाबत ज्या काही वेळोवेळी सूचना करण्यात येत असतील, त्यांची अंमलबजावणी प्रकल्प प्रवर्तकांनी करावी.

ड) या जनसुनावणीत मी प्रकल्प विस्तारीकरणास पाठिंबा देत आहे.

**३) सौ. नंदा राजेन्द्र म्हात्रे, पर्यावरणप्रेमी व सामाजिक कार्यकर्ती, राहणार-कणे गाव, तालुका-पेण, जिल्हा-रायगड:-**

धरमतर जेट्टीच्या प्रस्तावित विस्तारीकरण (फेज-) प्रकल्पाच्या पर्यावरण आघात मुल्यांकन (ईआयए) मुल्यांकन अहवालाबाबत मला काही मुद्दे उपस्थित करायचे आहेत.

बैठकीत जे सादरीकरण करण्यात आले, ते २३ (तेवीस) पानांचे मराठीत सादर करण्यात आले. मात्र उप विभागीय अधिकारी कार्यालय, पेण यांच्याकडून प्रस्तावित प्रकल्पाबाबत मराठी माहिती अकरा पानांची उपलब्ध करण्यात आलेली होती, याची नोंद घेण्यात यावी.

आम्ही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ कार्यालयास वारंवार विचारणा करीत होतो की पर्यावरण आघात मुल्यांकन (ईआयए) अहवालाची मराठी प्रत साक्षांकित करुन उपलब्ध करण्यात यावी. येथे मराठी सादरीकरण तेवीस पानांचे करण्यात आलेले आहे, तर आम्ही आमच्या सूचना/आक्षेप हे अकरा पानांच्या अहवालानुसार तयार करण्यात आलेला आहे.

यावेळी, अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी याबाबत फक्त हरकती उपस्थित करण्याची सूचना केली.

नंदा म्हात्रे यांनी आक्षेप नोंदविताना सांगितले की पान क्रमांक २, चौथा पॅरा, यात नमुद करण्यात आलेले आहे की विस्तारीकरण प्रकल्पानंतर ४,००,१५५.३०० घनमीटर एवढे एकूण ड्रेजिंग होणार आहे. माझी विनंती आहे की २०२३ साली एम.सी.एम. आणि खारभूमी विभागाने तयार केलेला अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करण्यात आलेला आहे. त्या अहवालानुसार भविष्यात ड्रेजिंगला परवानगी देताना येथील बांधबंदी (Bunding) स्थितीचा विचार करण्यात यावा असा अभिप्राय आहे. मी लेखी निवेदनासोबत ९२ पानांचा अहवाल सोबत जोडलेला आहे.

**४) श्री दिलिप मधुकर म्हात्रे, राहणार-काळेश्री, पोस्ट-वडाव, तालुका-पेण, जिल्हा-रायगड:-**

जसे आमटे व नागोठणेमध्ये पाणीपुरवठा केला जातो, तशी नैतिक जबाबदारी कंपनीने घेऊन खारेपाट्यामध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविला पाहिजे. जेटी प्रकल्प विस्तारीकरणास आमची काहीही हरकत नाही, मात्र खारेपाट्यातील पाणीपुरवठ्याचा व आरोग्यसेवेचा - हॉस्पिटलचा प्रश्न हा सुटलाच पाहिजे. स्थानिकांना विविध आजारांसाठी मोफत उपचार होणे गरजेचे आहे. प्रकल्प विस्तारीकरणास जाहीर पाठिंबा.

**५) श्री मिलिंद पाटील, मुक्काम-बोरजे, तालुका-पेण, जिल्हा-रायगड:-**

येथे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने आयोजित केलेल्या जेएसडब्लु धरमतर जेट्टीची प्रस्तावित विस्तारीकरण (फेज-III) प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी बैठकीत मी प्रकल्प प्रवर्तकांच्या सीएसआर विभागाचे अभिनंदन करतो. त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक सूचना, विचार किंवा आक्षेप नोंदविण्याची सूचना केली.

श्री मिलिंद पाटील यांनी विचार मांडले की स्थानिक मच्छीमारांना न डावलता विस्तारीकरण प्रकल्प (फेज-III) करण्यात यावा, त्यास आमचा पाठिंबा आहे.

**६) श्री राजेश भिकाजी मोकल, माजी सरपंच, वडखळ, तालुका-पेण, जिल्हा-रायगड:-**

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार फेज-I, फेज- II प्रकल्पास आपणास मान्यता दिलेली आहे. आता अत्याधुनिक प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित करुन प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्प (फेज-III) स्थापित करण्यात यावा, हा प्रकल्प आम्हां स्थानिकांना हवा आहे. तसेच सर्व प्रदूषण नियमनांचे पालन करण्यात येऊन प्रस्तावित राबविण्यात यावा, त्यास आमचा पाठिंबा आहे. येथे स्थानिक जनता बहुसंख्येने उपस्थित आहेत, ते विरोध करण्यास आलेले नाहीत. आम्हांला विकास हवा, त्यासाठी प्रकल्पास पाठिंबा आहे.

**७) उल्का महाजन, सामाजिक कार्यकर्ती व पर्यावरणीय अभ्यासक, राहणार-रोहा, रायगड जिल्हा:-**

मी रायगड जिल्ह्यात गेले ३५ वर्षे सामाजिक कार्यकर्ती व पर्यावरणीय अभ्यासक म्हणून काम करत आहे. येथे जेएसडब्लु प्रकल्पामुळे जे प्रदूषण होत आहे, त्यामुळे एस.टी.तून जाता-येता जे धुरकट वातावरण वातावरण वर्षभर पसरलेले असते. एस.टी. कासू गावातून वडखळ गावापर्यंत येताना नाक दाबून बसावे लागते अशी परिस्थिती आहे. जर प्रकल्पात प्रदूषण नियंत्रण संयंत्रणा सक्षमपणे राबवित असतात आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ जर त्यावर लक्ष ठेवत असते, तरीही गेले अनेक वर्षे एक कणही धुरकटपणा कमी झालेला नाही, याचे कारण काय? येथील सामान्य माणसांना साध्या डोळ्यांनी दिसणारे प्रदूषण महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास व शासनास कसे दिसत नाही? हा पहिला मुद्दा आहे.

दुसरा मुद्दा – जेट्टीचे विस्तारीकरण होणार आहे. त्याची क्षमता वाढणार आहे. त्यासाठी ४१ लाख घनमीटर कॅपिटल ड्रेजिंग करावे लागणार आहे. आतापर्यंत प्रकल्पासाठी जे ड्रेजिंग करण्यात आले, त्यामुळे जे दुष्परिणाम होतात, त्याचा कोणताही शास्त्रशुध्द अभ्यास करण्यात

आलेला नाही. ड्रेजिंगमुळे येथील किनारे खचत असून त्यामुळे मासेमारीस अडथळा उत्पन्न होत आहे. त्यामुळे स्थानिक मच्छिमारांच्या बोटी जाऊ शकत नाही, त्यामुळे मासेमारीवर परिणाम झालेला आहे. स्थानिक शेतीवरही परिणाम झालेला आहे. विस्तारीकरणामुळे शेतीवरील धोका मोठ्या प्रमाणात वाढणार आहे, कारण शेती नासत आहे. जर प्रकल्पामुळे शेतीवर व मच्छिमारीवर परिणाम होत असेल, तर प्रचंड प्रमाणात रोजगार बुडणार आहे. या जेटीविस्तारीकरणामुळे फक्त २५० व्यक्तींना रोजगार मिळणार आहे, तर शेती, मच्छिमारीवर परिणाम झाल्यामुळे प्रचंड प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारावर परिणाम होणार आहे. या प्रकल्पासाठी अंबा नदीतून पाण्याचा उपसा करण्यात येतो. त्यात दीडपटीने वाढ होणार आहे. त्यामुळे जे पिण्याच्या पाण्याचे जे असंतुलन होणार आहे, त्याबाबत अभ्यास करण्यात आलेला नाही.
त्यांनी येथील स्थानिकांना आवाहन केले की पूर्वजांनी दिलेली जमीन जर प्रकल्प प्रवर्तक हिसकावून घेणार असेल, तर ते अजिबातच सहन केले जाणार नाही. जर प्रकल्प विस्तारीकरणास परवानगी दिली, तर विनाश, हानी जास्त आहे, तर लाभ खुपच कमी आहे. तरी विनाश हवा का विकास हवा याचा विचार करण्याची गरज आहे. रायगड जिल्ह्यातील एक नागरिक म्हणून मी कळकळीची विनंती करत आहे.

८) **यावेळी एका व्यक्तीने ओरडून सांगितले की** लोक काहीही म्हणतील, मात्र आमचा प्रकल्प विस्तारीकरणास जाहीर पाठिंबा आहे.

९) **श्री योगेश काशिनाथ पाटील, सदस्य, ग्रामपंचायत वडखळ, तालुका-पेण, जिल्हा-रायगडः-**

जेटी लगत आमच्या शेतक-यांच्या जमिनी आहेत. खारफुटीमुळे तेथे कांदळवन वृक्ष आहेत. तरी कांदळवृक्ष काढण्याची आपण परवानगी द्यावी. म्हणजे आम्ही विकसनासाठी जमिनी देऊ. खारफुटीच्या जमिनीत जे कांदळवन वृक्ष आहेत, ते काढण्याची परवानगी द्यावी. आम्ही स्थानिक लोक असुन या प्रकल्पापासून धुळीचा, प्रदषणाचा त्रास आम्हांला अजिबात

होत नाही. येथील प्रकल्पविरोधी लोकांनी प्रकल्पास विरोध करून रायगड जिल्ह्याचे नुकसान केलेले आहे.

**१०) सौ. मोहिनी गोरे, सामाजिक कार्यकर्ती,राहणार-पेण, तालुका-पेण, जिल्हा-रायगड:-**

येथे जरी जनसुनावणी आहे, तरीही लोकांचा आवाज दाबला जात आहे. प्रकल्प फेज-१ किंवा फेज-२ असेल, त्यात आमची जी शेती असेल, मच्छिमारी असेल, स्थानिक पर्यावरण असेल, त्याचे खूपच नुकसान झालेले आहे. आम्ही प्रकल्पाच्या विरुध्द नाही, मात्र आमची शेती, आरोग्य, आमचे पिढ्यानपिढ्या जपलेले पर्यावरण उध्वस्त होणार असेल, तर आम्ही या प्रकल्पास पाठिंबा देत नाही. आम्ही पृथ्वीचे रहिवाशी असून हवामान बदलामुळे मोठ्या प्रमाणात पूर येत असून त्यामुळे प्रचंड हानी होत आहे.

**११) त्यावेळी एका स्थानिकांनी आक्षेप नोंदविला** की ज्यांची एक गुंठाही जमीन नाही, त्यांना येथे शेतकरी म्हणून बोलायचा अधिकारी कोणी दिला?

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना आवाहन केले की प्रस्तावित प्रकल्पाविषयी फक्त पर्यावरणीय सूचना, विचार किंवा आक्षेप उपस्थित करण्यात यावेत. त्याशिवाय संबंधित प्रकल्पाविषयी काही सूचना वा आक्षेप नोंदविण्याचे असल्यास ते लेखी स्वरुपात सोमवार दिनांक २५-०८-२०२५ ते मंगळवार दिनांक २६-०८-२०२५ पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय,रायगड,अलिबाग येथे सादर करु शकतात. त्याची पोच देण्यात येईल. तसेच सदरहू लेखी सूचना/आक्षेप बैठकीच्या इतिवृत्तासोबत शासनास सादर करण्यात येईल.

**१२) श्री अनिल परशुराम पाटील, राहणा-पेझारी, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड, सचिव, शेतकरी संघर्ष समिती:-**

येथे धरमतर जनसुनावणी जी कार्यरत आहे, त्याबाबत सूचना करताना सागंतो की सीआरझेड, २०१९ नियमानुसार जेट्टी विस्तारीकरण (फेज-३) होऊ शकत नाही. कारण प्रकल्प विस्तारीकरणासाठी कांदळवनाची कत्तल होणार आहे. एक कांदळवन वृक्ष तोडल्यास प्रकल्प

प्रवर्तकांना त्याच्या बदल्यात हजारे कांदळवन वृक्ष निर्माण करावयाचे आहेत. त्याची काटेकोर अंमलबजावणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ करेल का नाही हा माझा मुद्दा आहे. तरी त्याची पूर्णपणे अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच विस्तारीकरणामुळे जो बार्ज तयार होईल, त्यामुळे पाणी वाढणार आहे, त्याबाबत योग्य ती सुनावणी व्हावी.

१३) **एडव्होकेट तन्मय हरिशचंद्र पाटील, राहणार-पेण,ता.-पेण, जि-रायगडः-**

गडप ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात माझी जमीन असून मी शेतकरी आहे. मागच्या जनसुनावणी जे मुद्दे उपस्थित करण्यात आलेले होते, तेच आता परत उपस्थित होत आहेत. कारण या जेएसड्ब्ल्यु कंपनीमुळे स्थानिकांना रोजगार मिळणार नसून स्थानिकांचा रोजगार हा त्यांच्याकडून हिरावून घेण्यात येणार आहे. कारण कंपनी ही स्थानिकांना कायमस्वरुपी रोजगार देणारच नाही. आज २५० लोकांना रोजगार देण्यासाठी हजारे लोकांचा रोजगार हिरावून घेण्याचा कोणताही अधिकार हा या कंपनीस नाही.

येथे अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी फक्त पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले.

१४) **श्री मंगेश भगत, राहणार-शहाबाज, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगडः-**

मी येथील प्रदूषणाबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास लेखी पत्र पाठविलेले आहे. प्रकल्पात उत्पन्न होणारा जो स्लॅग आहे, त्याची विल्हेवाट कशी लावणार याबाबत काहीही माहिती नाही. कारण हा स्लॅग रस्त्यावर टाकला जातो. शेतात टाकल्याने शेत नापीक होते.

तसेच म.प्र.नि. मंडळाने एच.व्ही.एस. कुठे लावते याची माहिती नाही. तरी ती माहिती उपलब्ध करण्यात यावी. अन्यथा माझ्या घराच्या अंगणात एच.व्ही.एस. लावण्यात यावा, त्याचे रिडिंग मी उपलब्ध करेन.

प्रकल्प प्रवर्तक दोन हजार कोटी प्रदूषणासाठी खर्च केले असे सांगतात, तर त्याची संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

प्रकल्प प्रवर्तक प्रकल्पात स्थानिकांना रोजगार उपलब्ध केल्याबद्दल माहिती सांगते. तर प्रकल्पबाधित प्रत्येक पंचायत समितीत स्थानिकांना जो रोजगार देण्यात आला, त्याची यादी लावण्यात यावी.

**१५) श्री प्रसाद खेलुराम भोईर, राहणार-झोतीरपाडा, शिहू गांव, तालुका-, जिल्हा-रायगडः-**

पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी जी आयोजित करण्यात आलेली आहे. तर पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाबाबतचे दोन मुद्दे उपस्थित होतात. एक पर्यावरणीय आघात व दुसरा स्थानिकांच्या दृष्टीने महत्वाचा म्हणजे सामाजिक व आर्थिक आघात. याठिकाणी दोन्ही बाजूने टोकाची भूमिका घेतली जाते. कारण प्रस्तावित प्रकल्प हा शाप की वरदान ही प्रश्नच नाही, प्रकल्प हा प्रत्येकालाच हवा आहे. प्रत्येकाला प्रकल्पामुळे काही काळजी, चिंता वाटते.

पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात, सादरीकरणात सर्व आधुनिक प्रदूषण नियंत्रण सयंत्रणांचा उल्लेख करण्यात आलेला आहे. आहे. तरी सर्व प्रदूषम नियंत्रण सयंत्रणा कंपनी कार्यान्वित करणार आहेच. शिवाय ती कार्यान्वित करणे हे बंधनकारकच आहेत. मात्र सर्व प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा सक्षमपणे कार्यान्वित आहे की नाही हे वेळोवेळी तपासणे ही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व शासनाची जबाबदारी आहे.

हवेतील प्रदूषण एस.पी.एम., आर. एस.पी.एम., पी.एम -२.५ सारखी प्रदूषके ज्यामुळे कॅन्सर सारखा आजार होऊ शकतो, ती प्रदूषके जगातील कोणत्याही स्टील उद्योगातून उत्पन्न होत असतात. मात्र ती प्रदूषके शासनाने पारित केलेल्या मानकांप्रमाणेच आहेत की नाही हे पाहणे हा पर्यावरणविषयक जनसुनावणीचा विषय हवा.

तर स्थानिकांचा असा अनुभव आहे की दिवसा सर्व प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित ठेवण्यात येतात, मात्र रात्रीच्या वेळी वीज वाचविण्यासाठी किंवा इतर काही गोष्टींमुळे प्रदूषण

नियंत्रण सयंत्रणा ही बंद करण्यात येते. तरी माझी सूचना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास आहे की कंपनीस त्यांच्या जबाबदारीची जाणीव करुन देण्यात यावी.

तर मी नम्रपणे सांगू इच्छितो की खाडी (creek) हे आमचे जीवन आहे. आम्हांला आवश्यक असणा-या सर्व छोट्या, मोठ्या जीवनावश्यक वस्तू या खाडीवर अवलंबून आहे. जर प्रकल्पापासून प्रदूषण होणार नसेल, तर स्थानिकांचा प्रकल्पास विरोध नाही. कंपनीने फक्त फक्त सर्व प्रदूषण नियंत्रणात ठेवावे. कंपनीने परिसरातली सामाजिक, शैक्षणिक व आरोग्यविषय काळजी घ्यावी.

**१६) श्री सुनील बामा गायकर, उपसभापती, पंचायत समिती - पेण, उचेड गावा, कांदळेपाडा, तालुका-पेण, जिल्हा-रायगडः-**

परिसरातील लोकांनी प्रकल्प का हवा आहे व का नको याबाबत ब-याच अफवा उठविलेल्या आहेत. मात्र अफवा उठवीत असताना आमची एकच मागणी आहे की कंपनीने सर्व प्रदूषण नियंत्रणाची काळजी घ्यावी. आम्ही पेण तालुक्यातील सर्वजण येथे जमलेलो असून आमचा कंपनीच्या विस्तारीकरणास पूर्णपणे पाठिंबा आहे.

**१७) डॉ. वैशाली पाटील, पर्यावरणवादी, राहणार-पेण,तालुका-पेण, जिल्हा-रायगडः-**

आम्ही पर्यावरणप्रेमी असून पर्यावरणातून उपक्रम व उपजीविका वाढविणे हा आमच्या संस्थेचा पूर्ण उद्देश आहे.

माझा प्रमुख आक्षेप आहे की जनतेच्या अवलोकनार्थ विविध ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले, पोर्टलवर उपलब्ध असलेले दोन्हीही प्रकल्पाचे पर्यावरण आघात मुल्यांकन (ईआयए) अहवाल हे संक्षिप्त स्वरुपातील होते.

मा. सुप्रीम कोर्टाने विविध वेळी पारित केलेल्या निर्देशांनुसार स्थानिकांना त्यांना समजेल अशा स्थानिक भाषेत संपूर्ण पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल हा भाषांतरित करुन देणे (येथे मराठीत) हे अपेक्षित असताना तो हेतुपुरस्कर देण्यात आलेला नाही, त्यामुळे येथील ९९%

स्थानिक लोक संपुर्ण ईआयए - पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल हा वाचूच शकलेले नाहीत. हा माझा पहिला आक्षेप आहे. त्यामुळे ही आयोजित करण्यात आलेली पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी ही बेकायदेशीर आहे, अवैध आहे.

माझा दुसरा आक्षेप आहे गेले चार दिवस या परिसरात अतिवृष्टी होत आहे. आज येथील आदिवासी समाजातील लोकांचा अत्यंत महत्वाचा असा पिठोरी अमावस्या हा मोठा सण आहे. त्यांच्या शेतीच्या कामाच्या वेळी जनसुनावणी ही आयोजित करण्यात येऊ नये, योग्य मोसम पाहूनच जनसुनावणी ही आयोजित करण्यात यावी असे निर्देश मा. सुप्रीम कोर्टाचे असतानाही ही बैठक आयोजित करण्यात आलेली आहे.

तिसरा आक्षेप येथे पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणीसाठी आपण एक तास, दोन तास अशी मर्यादा घालू शकत नाही. तरी आपण ही मर्यादा वाढवावीत ही विनंती.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी सागितले की ज्यांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक लेखी सूचना, विचार वा आक्षेप नोंदवायच्या आहेत, त्यांनी त्या लेखी स्वरुपात जिल्हाधिकारी कार्यालय,रायगड,अलिबाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या कार्यालयात सोमवार दिनांक २५.०८.२०२५ ते २६.०८.२०२५ पर्यत सादर कराव्यात. बैठकीच्या इतिवृतांतासोबत त्या शासनास सादर करण्यात येतील.

**१८) <u>श्री संदीप ठाकूर, राहणार-पेण, तालुका-पेण, जिल्हा-रायगड:-</u>**

पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. प्रकल्प विस्तारीकरणास महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा संपूर्ण पाठिंबा आहे. तसेच त्या संदर्भात आम्हांला तीन सुचना द्यायच्या आहेत –

अ)प्रकल्पात रोजगाराची संधि देताना रायगड जिल्ह्यातील स्थानिक जेईटी, स्थानिक अभियांत्रिकी महाविद्यालये येथे कॅम्पस मुलाखती घेण्यात येऊन स्थानिक विद्यार्थी-विध्यार्थीतींना रोजगार देण्यात यावा.

ब) पर्यावरणविषयक सूचना करण्यात येते की ड्रेजिंग होते, तर खारेपाटी भागात ब-याच प्रमाणात पुरस्थिती तयार होते. त्याबाबत लक्ष देण्यात यावे,

क)प्रकल्पात जे ध्वनी प्रदूषण होते, तर केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी पारित केलेले सर्व निर्देश पाळण्यात यावेत. त्यासाठी अत्याधुनिक सयंत्रणेचा पुरेपुर वापर करण्यात यावा,

ड) जर जेएसड्बल्यु सारखा मोठा प्रकल्प पेण तालुक्यात कार्यरत असताना सीएसआर उपक्रम पेण तालुक्यातही मोठ्या प्रमाणात राबविण्यात याव्यात, जेणेकरुन पेण तालुक्याचा विकास व्हावा.

**१९) श्री हेमंत पाटील, स्थानिक जागरुक नागरिकः-**

पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी असताना लोक इतर विषयांवर बोलतात, तर वडखळ येथील रस्ता दुरुस्त करण्यात यावा,येते पिण्याचे पाणी मिळत नाही.

**२०) श्री संजय जांभळे, डोळवी गाव, तालुका-पेण, जिल्हा-रायगडः-**

मी फक्त पर्यावरणावरच बोलणार आहे. पर्यावरणाची नासाडी याचे सुंदर उदाहरण देतो. २०१८ साली समिता राजेश पाटील यांनी राष्ट्रीय हरित लवाद (National Green Tribunal – NGT) येते तक्रार केलेली होती. त्यावेळी प्रकल्प प्रवर्तकांनी कांदळवनाचे कशा प्रकारे कत्तल केली, आणि त्यांनी वडखळ व डोळवी ग्रामपंचायतीने तोडला असे लिहून दिलेले आहे. आता आपण प्रदूषण काय आहे हे पहात आहात.

बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी परत उपस्थितांना आवाहन केले की ज्यांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक लेखी सूचना, विचार वा आक्षेप नोंदवायच्या आहेत, त्यांनी त्या लेखी स्वरुपात जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड, अलिबाग आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या कार्यालयात सोमवार दिनांक २५.०८.२०२५ ते २६.०८.२०२५ पर्यत सादर कराव्यात. बैठकीच्या

इतिवृत्तासोबत त्या केंद्रीय शासनास सादर करण्यात येतील. त्यांनी सर्वांचे आभार मानून पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

प्राप्त झालेले एकूण १२,३६३ पाठिंबा/सूचना याबाबत आणि ३९४ आक्षेप याबाबत पत्रे सोबत जोडलेली आहेत. तसेच, प्रकल्प प्रवर्तक यांनी जाहीर जन सुनावणीत (विस्तारिकरण) विचारण्यात आलेल्या प्रश्नांना अनुसरून त्यांचा खुलासा व प्रस्तावित प्रकल्पाबाबत संक्षिप्त माहिती ही म. प्र. नि. मंडळास सादर केलेली असून त्याची प्रत या इतिवृत्तासोबत संलग्न करण्यात आलेली आहे.

०४/०९/२५

**(ऋतुजा भालेराव )**
आयोजिका,
पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी
समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
रायगड-२,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
रायगड,
रायगड भवन, नवी मुंबई

**(संजय भोसले)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी
समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
रायगड,
नवी मुंबई

**(संदेश शिर्के)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, रायगड, अलिबाग, जिल्हा – रायगड